कला अकादमी गोवा
कांपाल – पणजी
कअ/काविवि/ति.दि/२०२५–२६/७९७
दि.०४/०७/२०२५

कृपया प्रसिध्दीसाठी

## कला अकादमीत आज "बोलावा विठ्ठल"

आषाढी एकादशीच्या पुण्यपावन पूर्वसंध्येला कला अकादमीतर्फे आज शनिवार दि. ५ जुलै २०२५ रोजी सायं. ५.३० वा. कला अकादमीच्या कृष्ण कक्षात **"बोलावा विठ्ठल"** हा भाव भक्तीचा सुश्राव्या असा भक्तीमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात धनंजय जोशी व श्रीमती धनश्री गाडगीळ भक्तीरसात ओथंबलेल्या विविध संताच्या विविध रचना या कार्यक्रमांतर्गत सादर करणार आहेत.

सदर कार्यक्रमासाठी श्री. सुभाष फातर्पेकर(संवादिनी), श्री. रोहिदास परब(तबला), श्री. हेमंत तिवटे(पखवाज), श्री. जयराम सावंत(तालवाद्य) हे कलाकार साथसंगत करणार असून निवेदनाची बाजू डॉ. सचिन वायगांवकर सांभाळणार आहेत.

कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून संगीतप्रेमी रसिकांनी आवर्जून उपस्थित रहावे असे कला अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

सोबतःफोटो

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)